प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या अनुषंगाने राज्यस्तरीय संमेलन बुधवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र, मुंबई येथे आयोजित करण्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एसएलबीसी-१६१८/प्र.क्र.१७४/का-१४१७

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १८ मार्च, २०१९

<u>वाचा</u> : १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसएलबीसी-१६१६/प्र.क्र.४९/का-१४१७, दिनांक १४ जून, २०१६

२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसएलबीसी-१६१७/प्र.क्र.८४/का-१४१७, दिनांक २५ एप्रिल, २०१७

३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसएलबीसी-१६१७/प्र.क्र.८४/का-१४१७, दिनांक २९ सप्टेंबर, २०१७

४) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसएलबीसी-१६१८/प्र.क्र.१७४/का-१४१७, दिनांक ७ डिसेंबर, २०१८

<u>प्रस्तावना:</u>

प्रधानमंत्री मुद्रा बँक योजना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी पासून पूर्ण देशात कार्यान्वीत झाली आहे. सदर योजनेअंतर्गत कुठल्याही प्रकारचे तारण अथवा जामीनदाराशिवाय होतकरू बेरोजगार युवकांना कर्जपुरवठा करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कर्ज पुरवठा करण्यात येतो.

२. प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेचा लाभ जास्तीत जास्त तरुणांना मिळावा यासाठी या योजनेचा प्रचार, प्रसार व समन्वय करण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेच्या अंमलबजावणीबाबत जनतेकडून विविध मुद्दे उपस्थित केली जात होती. यासंदर्भात योग्य प्रकारे संनियंत्रण व समन्वय होण्याकरीता राज्यस्तरावर प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेचे संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. या संकेतस्थळाचे उदघाटन यशवतंराव चव्हाण केंद्र येथील सभागृहात दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी आयोजित राज्यस्तरीय संमेलनामध्ये करण्यात आले आहे.

३. प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या संदर्भात दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी आयोजित राज्यस्तरीय संमेलनासाठी होणाऱ्या अपेक्षित खर्चास उपरोक्त नियोजन विभागाचे संदर्भीय ४ येथील शासन निर्णयान्वये खर्चास "प्रशासकीय व वित्तीय मान्यता" देण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रमाची वेळ, उपस्थित असणारे मान्यवर तथा उपस्थितांच्या खानपान यामध्ये ऐनवेळी बदल झाला असल्या कारणाने यशवंतराव चव्हाण केंद्र, मुंबई येथील सेंट्रल केटरर्स (All Seasons) या संस्थेकडून उपस्थितांना पुरविण्यात आलेल्या जेवण/अल्पोपहार इ.सेवांचे देयक यास नव्याने "प्रशासकीय व वित्तीय मान्यता" देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

वरील बाबीस अनुसरून प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या अनुषंगाने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी राज्यस्तरीय संमेलनामध्ये यशवंतराव चव्हाण केंद्र, मुंबई येथे सेंट्रल केटरर्स (All Seasons) या एकाधिकार प्राप्त संस्थेकडून जेवण/अल्पोपहार पुरविण्यात आला होता. सबब, सेंट्रल केटरर्स (All Seasons) या संस्थेकडून प्राप्त झालेल्या दर पत्रकानुसार रुपये **२,३१,३९८/-** (दोन लाख एकतिस हजार तीनशे अठ्ठयाणव फक्त) इतक्या खर्चास नव्याने "प्रशासकीय व वित्तीय मान्यता" देण्यात येत आहे.

अ. क्र.	तपशील	दर	प्रमाण	एकूण रक्कम रु.
१	Veg-Buffet Hi Tea	रु. ४००/- + वस्तु व सेवाकर (१८%)	४००	१,६०,०००/-
२	Mineral Water २०० ML	रु. ८/- + वस्तु व सेवाकर (१८%)	१४५०	११,६००/-
३	VIP Room Snacks	रु. १७५/- + वस्तु व सेवाकर (१८%)	२०	३,५००/-
४	Tea/Coffee & Biscuits	रु. ३५/- + वस्तु व सेवाकर (१८%)	४००	१४,०००/-
५	Snacks Box	रु. १४०/- + वस्तु व सेवाकर (१८%)	५०	७,०००/-
			एकूण	**१,९६,१००/-**
			CGST (९%)	**१७,६४९/-**
			SGST (९%)	**१७,६४९/-**
			एकूण देय रक्कम	**२,३१,३९८/-**

२. सदरचा खर्च मागणी क्रमांक ओ-७, ३४५१ सचिवालय- आर्थिक सेवा, ०९०, सचिवालय (०१) नियोजन विभाग, मुद्रा बँक योजनेचा प्रचार, प्रसार आणि समन्वय (३४५१ अे ००१) (योजनांतर्गत) (दत्तमत), २६ जाहिरात व प्रसिध्दी या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल. या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चासाठी

उपसचिव (का-१४२२), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी असतील व कार्यासन अधिकारी, का-१४२२, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ ठेवण्याची तसेच खर्चाची माहिती वेळोवेळी शासनाला देण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी म्हणून उपसचिव, आस्थापना यांची राहील.

३. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग दोन अनुक्रमांक १०, परिच्छेद क्रमांक ३१ (अ) (१) अन्वये प्रशासनिक विभागाला असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१८१६५९०८१९१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRADNYA MAHALE

Digitally signed by PRADNYA MAHALE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=31c8683f52ccbefd97bce49983c4151d2caf1c185c65
7ea855ac85f31e5f681e, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=f0b9244e8f45f12e0a399cd036d6d3767c67c83
49951e3e5047b7469a24cdfb2, ou=PLANNING DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRADNYA MAHALE
Date: 2019.03.18 17:01:16 +05'30'

(प्रज्ञा सं.महाले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई-२३
२) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-२३
३) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
५) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे खाजगी सचिव
६) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
७) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
८) अधिदान व लेखाअधिकारी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई-५१
९) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१०) उपसचिव (का-१४२२), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का-१४११/का-१४२२/का-१४२४), मुंबई-३२
१२) निवडनस्ती (का-१४१७), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.